७७

I.O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. District (जिल्हा): नाशिक ग्रामीण  **P.S.(ठाणे):** लासलगांव  **Year (वर्ष):** 2023

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0015  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/01/2023 22:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. Day(दिवस): दरमियानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 24/01/2023

Time Period (कालावधी):  **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/01/2023

**Time From (वेळेपासून):** 10:56 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/01/2023  **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

Entry No. (नोंद क्र.): 021  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/01/2023 22:16 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 20 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय देवगांव तानिफा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश बाळसाहेब वाघ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो दहेगांव तानिफाड ,लासलगांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो दहेगांव तानिफाड ,लासलगांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक लक्ष्मण फकिरा वैराळ | | | 1. भरवस तानिफाड जि नाशिक , लासलगांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद लासलगांव पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण दिनांक 25/1/2023मी निलेश बाळसाहेब वाघ, वय- 30 वर्ष, व्यवसाय - गरेज/शेती, राहणार- मु.पो. दहेगांव ता.निफाड जि.नाशिक मोबाईल नंबर 8007116596समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वर नमुद पत्यावर माझे कुटूंबासह राहत असुन मी शेती तसेच गरेजचा व्यवसाय चालवुन माझे कुंटुबाचा उदर निर्वाह करतो. विंचुर ता.निफाड येथे जय बाबाजी अँटो नावाचे गरेज असुन त्यामध्ये मी दुचाकी दुरुस्तीचे काम करतो. माझे चुलते श्री. दिलीप सदु वाघ व इतर दोन चलुते यांची दहेगांव ता.निफाड षिवारातील गट क्रमांक 49/2 ची षेती आहे. सदर गट क्रमांक 49/2 मध्ये तीन्ही चुलते यांचे जमीन वाटप करून सदर जमीनाच्या सातबारा उता-यावर चुलता श्री. दिलीप वाघ व इतर दोन चुलत्यांचे नावे लावायची होती. त्यासाठी संबधीत कागदपत्र जमा करून चुलता श्री. दिलीप वाघ यांनी दिनांक 20/09/2022 रोजी तहसिलदार कार्यालय निफाड येथे विंनती अर्ज दिला होता.
चुलता श्री. दिलीप वाघ यांचे विनंती अर्जावरून मा. शरद घोरपडे, तहसिलदार निफाड, यांचे तहसिल कार्यालय निफाड कडील क्रमांक आरटीएस/वाटप/एसआ/305/2022, निफाड च्या आदेशा नुसार वाटपाचे आदेश काढण्यात आलेल आहेत. तहसिल कार्यालयाकडील वरील आदेश मी सजा भरवस ता.निफाड येथे जावुन कोतवाल श्री.लक्ष्मण वैराळ यांच्याकडे जमा करून त्याबाबतची खाते वाटपाची नोंद घालण्याबाबत सांगितले होते. दिनांक 20/01/2023 रोजी मी, चुलते श्री.दिलीप वाघ व इतर दोघांचे गट क्रमांक 49/2 वर च्या सातबारा उतार-यावर खाते वाटपाची नोंद झाली किंवा नाही याची विचारपुस करण्यासाठी सजा भरवस ता.निफाड येथे जावुन कोतवाल श्री.लक्ष्मण वैराळ भेटलो. त्यावेळी मी कोतवाल श्री. लक्ष्मण वैराळ यांचे सोबत वरील कामाबाबत चर्चा केली असता त्यावेळी गट क्रमांक 49/2 जमीनीचे सातबारा उता-यावर चुलते श्री दिलीप वाघ व इतर दोन चुलत्यांची नावाची नोंद करून ती मंजुर करून घेण्याच्या मोबदल्यात माझेकडे 5000/- रू. मागणी केली आहे. त्यावेळी मी त्यांना होकार देवुन नंतर येतो असे सांगुन तेथुन निघुन गेलो. वर नमुद कामासाठी मी आज दि.24/1/2023 रोजी सजा भरवस येथे जाणार आहे. मी जर श्री. लक्ष्मण वैराळ, कोतवाल सजा भरवस ता.निफाड यांना त्यांचे मागणी प्रमाणे 5000 /- रुपये दिले नाही तर ते गट क्र. 49/2 च्या जमीनीवर सात बारा उता-यावर माझे चुलते श्री.दिलीप वाघ इतर दोन चुलत्यांची नावांची नोंद करण्याच्या कामात श्री. वैराळ हे नोंद घालण्यासाठी तसेच मंजुर होणेसाठी काहीतरी अडथळा करून विलंब करतील याची मला खात्री आहे. परंतू मला श्री. लक्ष्मण वैराळ, कोतवाल सजा भरवस ता.निफाड यांना 5,000/- रुपये लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे दि.24/01/202 रोजी सपंर्क साधुन माहिती दिली होती. मी दिलेल्या माहितीवरून पोनि/श्री. साळुंखे लाप्रवि नाशिक हे स्वतः तसेच त्यांचेसोबत सापळा पथक, नगर भुमापन अधिकारी क्रमांक 1, नाशिक, भुमी अभिलेख कार्यालया कडील पंच श्री. रविंद्र नारायण जाधव व पंच श्री. मच्छिंद्र देवराज भारस्कर असे षासकीय वाहनाने जय बाबाजी अँटो गरेज, विंचुर येवला रोड जि. नाषिक येथे माझी भेट घेतली. त्यानंतर पोनि/श्री.साळुंखे यांनी त्यांची स्वतःची तसेच दोन शासकीय पंच, सापळा पथक अशांची ओळख करून दिली. त्यांनतर

पोनि/श्री.साळुंखे यांनी दोन्ही पंचासमक्ष मला माझे तक्रारी बाबत विचारले असता त्यांना मी माझी तक्रार सांगुन माझे हस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर पोनि/श्री.साळुंखे, मी व दोन्ही पंचांनी सह्या केल्या.त्यानंतर माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे श्री. लक्ष्मण वैराळ, कोतवाल हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता, पोनि/श्री.साळुंखे यांनी मला तसेच पंच श्री. जाधव अशांना सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन 10.56 वाजता रेकॉर्डर चालु करुन कापडी पाउच मध्ये ठेवून ते पाउच माझे शर्टच्या खिशामध्ये ठेवुन दिले. त्यानंतर मी व पंच श्री. जाधव असे माझेकडील दुचाकी वाहन क्र. एच.एम.एच.15 ई. झेड. 3169 अॅक्टीवा ने तेथुन निघुन हटेल संगम, भरवस फाटा चौफुली, येवला रोड ता.निफाड जि.नाशिक येथे जाउन दुचाकी वाहन उभे केले. त्यावेळी हटेल संगम च्या बाजुला श्री. वैराळ हे सफेद पन्ट व सफेद शर्ट घालुन उभे होते. त्यावेळी मी श्री. वैराळ यांचे जवळ गेलो. त्यावेळी माझेत व कोतवाल श्री. लक्ष्मण वैराळमध्ये आपसात माझे कामाविशयी बोलणे झाले. त्यावेळी कोतवाल श्री. लक्ष्मण वैराळ यांनी माझेकडे माझे चुलते श्री. दिलीप वाघ व इतर दोघांचे गट क्रमांक 49/2 वर च्या सातबारा उतार-यावर खाते वाटपाची नोंद करून ती मंजुर करून घेण्याच्या मोबदल्यात 5000/- रू. लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच श्री. जाधव असे हटेल संगम, भरवस फाटा चौफुली, येवला रोड ता.निफाड जि.नाशिक येथुन निघुन जय बाबाजी अॅटो गरेज, विंचुर येवला रोड जि. नाशिक येथे परत आलो. त्यावेळी पोना/गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर पंच श्री.जाधव व मी सांगितलेली हकीगत तसेच डिजिटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामधील माझेतील व कोतवाल श्री.लक्ष्मण वैराळ यांचेत झालेले संभाशण सर्वांनी ऐकले. त्यावरुन कोतवाल श्री.लक्ष्मण वैराळ यांनी माझेकडे 5000/- हजार रू. लाचेची मागणी केल्याची सर्वांची खात्री झाली. त्यानंतर पुन्हा पोनि/श्री. साळुंखे यांनी सुचना दिल्या की मी व पंच श्री. जाधव अशांनी सजा भरवस येथे जावुन तलाठी यांची भेट घ्यावी. त्यानतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन चालु करुन कापडी पाउच मध्ये ठेवून ते पाउच माझे शर्टच्या खिशामध्ये सेफ्टी पिनने लावुन दिले. त्यानंतर मी व पंच श्री.जाधव असे माझेकडील दुचाकी वाहन क्र. एच.एम.एच.15 ई.झेड.3169 अॅक्टीवा ने हनुमान नगर, चंद्र-सुर्य मंदिर, विंचुर शिवार, ता. निफाड रवाना होवुन सजा भरवस ता.निफाड येथे जाउन दुचाकी वाहन उभे केले. त्यावेळी सजा भरवस ता.निफाड येथे तलाठी हजर नव्हते परंतु कोतवाल श्री. वैराळ हे हजर होते. त्यावेळी माझेत व कोतवाल श्री.लक्ष्मण वैराळमध्ये आपसात माझे कामाविशयी बोलणे झाले. त्यावेळी मी कोतवाल श्री. वैराळ यांना सांगितले की, मला पैषांची थोडी अडचण असुन 3,000/-रूपये जमा होत असल्याचे सांगितले. त्यावेळी कोतवाल श्री. लक्ष्मण वैराळ यांनी 3,000/- रू. आता आणुन दया व उरलले 2000/-रू. आठ दिवसानी असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर यापुढील कारवाई सर्वानुमते दिनांक 25/1/2023 रोजी करण्याचे ठरले. पो.नि.श्री.साळुंखे यांचे सुचनेवरून दि. 25/1/2023 रोजी सकाळी 11.45 वाजता हनुमान नगर, चंद्र-सुर्य मंदिर, विंचुर शिवार, ता.निफाड येथे हजर होतो. त्यावेळी पोनि/साळुंखे, दोन पंच व सापळा पथक असे हनुमान नगर, चंद्र-सुर्य मंदिर, विंचुर शिवार, ता. निफाड येथे हजर झाले. पोलीस निरीक्षक साळुंखे यांनी मला व सापळा पथकाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यांनतर सजा भरवस चे कोतवाल यांना लाचेची रक्कम देणे असल्याने मला लाचेची रक्कमेबाबत विचारले असता मी 500 रू. दराच्या 06 चलनी नोटा लाचेची रक्कम देण्यास हजर केल्या. सदर नोटांना पो.ना/महाजन यांचे करवी अॅन्थ्रासिन पावडर लावुन त्या नोटा माझे पन्टच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिल्या. त्यांनतर पोना/गवळी यांनी व्हईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते चालु करून माझे शर्टला लावुन दिले. त्यानंतर मी पंच श्री.जाधव यांचेसह कोतवाल श्री. वैराळ यांना 3000/- रूपये लाचेची रक्कम देण्याकामी सजा भरवस ता.निफाड येथे माझेकडील दुचाकी वाहनाने गेलो. परंतु सजा भरवस येथे कोतवाल श्री.वैराळ हे हजर नसल्याने मी त्यांना मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी लाचेची रक्कम घेवुन तलाठी कार्यालय देवगांव ता.निफाड येथे बोलविले. म्हणुन पोनि/साळुंखे यांचे सुचनेवरून मी पंचासह माझेकडील दुचाकी वाहनाने तलाठी कार्यालय देवगाव ता.निफाड येथे गेलो. तेथे पोनि श्री.साळुंखे व सापळा पथकातील सदस्य यांनी तलाठी कार्यालय देवगांव ता.निफाड च्या परिसरात माझे मागोमाग येवुन सापळा आयोजीत केला. त्यानंतर मी, पंच श्री. जाधव यांचेसह तलाठी कार्यालय देवगांव ता.निफाड येथील कार्यालयात जावून कोतवाल श्री. लक्ष्मण वैराळ यांची भेट घेतली असता, कोतवाल श्री. लक्ष्मण वैराळ यांनी माझेकडे 3,000/- रू. लाचेची मागणी केली त्यावरून मी त्यांचेसमोर लाचेची रक्कम धरली असता त्यांनी ती त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन, दोन्ही हाताने मोजुन त्यांचे अंगावरील पन्टच्या मागील खिषात ठेवली असता मी ठरल्या प्रमाणे पुर्वनियोजीत ईशारा केला. त्यावेळी ला.प्र.वि.,नाशिक चे सापळा पथकाने कोतवाल श्री. लक्ष्मण वैराळ यांना रंगेहाथ पकडले. तरी दि.24/11/2023 रोजी श्री. लक्ष्मण फकिरा वैराळ, वय -56 वर्श, व्यवसाय - नोकरी, पद -कोतवाल, सजा भरवस ता.निफाड जि. नाशिक, राहणार - मु. भरवस, पो. गोंदेगाव ता.निफाड, जि.नाशिक यांनी माझेकडे माझे चुलते श्री. दिलीप वाघ व इतर दोघांचे गट क्रमांक 49/2 वर च्या सातबारा उतार-यावर खाते वाटपाची नोंद करून ती मंजुर करून घेण्याच्या मोबदल्यात स्वतः साठी 5000/- रू. लाचेची मागणी करून, दिनांक 25/1/2023 रोजी 13.40 वाजता तलाठी कार्यालय देवगांव ता.निफाड येथे पंच साक्षीदारांसमक्ष 3000/- रुपये लाचेची रक्कम त्यांनी स्विकारली तसेच उर्वरीत 2,000/-रूपये लाचेची रक्कम 8 दिवसांनी स्वीकारण्याचे मान्य केले म्हणुन माझी श्री. लक्ष्मण फकिरा वैराळ, वय -56 वर्श, व्यवसाय - नोकरी, पद -कोतवाल, सजा भरवस ता.निफाड जि. नाशिक यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.माझी वरील संगणीकृत फिर्याद मला वाचुन दाखविली असता ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे. समक्ष हि फिर्याद दिली

13.Action **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Rahul Tukaram Wagh(I (Inspector)) / 15101000402RTWM8301V **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. **read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Rahul Tukaram Wagh
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402RTWM8301V